# देगलूर महाविद्यालयात विद्यार्थ्यांना निरोप



देगलूर / प्रतिनिधी

जीवनात यशस्वी होण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांनी पहिल्यांदा आपले ध्येय निश्चित करावे त्यानुसार अभ्यास करणे गरजेचे आहे असे प्रतिपादन देगलूर महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी तथा येथील सुपरीचीत डॉ. आदित्य सलगरकर यांनी केले.

येथील अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित देगलूर महाविद्यालयातील इयत्ता बारावी( विज्ञान) शाखेच्या विद्यार्थ्यांच्या निरोपसमारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेम्बरेकर होते. व्यासपीठावर प्राचार्य डॉ. मोहन खताळ, ,कार्यकारिणी सदस्य देवेंद्र मोतेवार,रवींद्र द्याडे, उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, उपप्राचार्य प्रा. चमकुडे ,प्रा. डॉ. व्यंकटेश शेरीकर, पर्यवेक्षक एस.एन. पाटील, ईंजिनिअर माधव सुरनर यांची उपस्थिती होती.

डॉ.सलगरकर म्हणाले की, प्रत्येक विद्यार्थ्यांनी अकरावी, बारावी विज्ञान शाखेत शिक्षण घेत असताना पहिल्यांदा आपले ध्येय निश्चित करावे.नंतर पुढील अभ्यासक्रमाला लागावे.विद्यार्थ्यांनी अंगी सदाचार, नम्रता ठेवत आपल्या गुरुजनांनी दिलेल्या मार्गदर्शनानुसार अभ्यास करावा नक्कीच आपल्याला यश प्राप्त होते. प्रारंभी आशा गायकांवळे हिने स्वागत गीत सादर केले. कल्पना मडपलवार,शीतल मुस्तापुरे यांनी गीतगायनाच्या माध्यमातून गुरुजनांविषयी आदर भावना व्यक्त केल्या. नंतर माही पबशेटवार,संजीवनी विभूते यांनी महाविद्यालय,शिक्षक व शिक्षणाविषयी मनोगत व्यक्त केले. देगलूर महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी इंजिनियर माधव सुरनर यांनी आपण तेलंगणामधून येऊन देगलूर महाविद्यालयात शिक्षण घेतल्याचे सागंत, ग्रामीण भागातील देगलूर महाविद्यालय हे एक दर्जेदार शैक्षणिक केंद्र असल्याचे सांगितले. प्रा.इ. के. पाटील, उपप्राचार्य प्रा.चमकुडे, डॉ.व्यंकटेश शेरीकर यांनी विद्यार्थ्यांना बारावी बोर्ड परीक्षा, अभ्यासक्रम संदर्भात मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. मोहन खताळ यांनी महाविद्यालयातील स्पर्धा परीक्षा,, कोटा येथील शिक्षकांनी सुरू केलेल्या वैद्यकीय, अभियात्रिकी वर्गाची माहिती दिली. सूत्रसंचलन शीतल पाटील,आरती परते ,प्रा.महेश कुलकर्णी यांनी तर आभार प्रा.सौ. निकीता ऐनलावार यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी कार्यालय अधीक्षक गोविंद जोशी नळगीरकर, किशन पांचाळ, .प्रा.प्रमोद गुजे, प्रा. सत्यजित सावळे,दत्तपसन्न साखरे ,सय्यद गौस यांनी प्रयत्न केले.

Scanned with OKEN Scanner